| वर्ष - 7 | अंक - 138 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™ बाप्पा मोरया

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 23 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पुणे जिल्ह्यात 63 'ब्लॅक स्पॉट'!

## सार्वजनिक बांधकाम विभागाला राज्य सरकारने पाठविला अपघातांच्या ठिकाणांचा अहवाल

**| पुणे | महाईन्यूज | प्रतिनिधी|**

**पुणे, पिंपरी-चिंचवडसह जिल्ह्याच्या ग्रामीण भागात अपघातांचे ६३ 'ब्लॅक स्पॉट' राज्य सरकारने निश्चित केले आहे. या 'ब्लॅक स्पॉट'मध्ये सिंहगड रस्त्यानजीक नवले पूल, भूमकर पूल, वारजेतील माई मंगेशकर रुग्णालय परिसर; तसेच सातारा रस्त्यावरील कात्रज चौक, दरी पूल, मुंबई-बेंगळुरू महामार्गावरील वाकड पूल, बावधन या परिसराचा समावेश आहे. त्याशिवाय खडकवासला, मुंढवा रेल्वे पूल, चंदननगर अशी महत्त्वाची ठिकाणे 'ब्लॅक स्पॉट' ठरत असून, त्या ठिकाणी २०१९ ते २०२१ दरम्यानच्या कालावधीत सर्वाधिक अपघात होऊन अनेकांचा मृत्यू झाला आहे.**




शहरासह जिल्ह्यात वारंवार होणाऱ्या अपघातांच्या ठिकाणांचा अहवाल सार्वजनिक बांधकाम विभागाला राज्य सरकारने पाठविला आहे. या संदर्भात जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत नुकतीच चर्चा झाली होती. पुण्यात सन २०२०पासून अपघातांच्या संख्येत ११३ टक्क्यांची वाढ झाली आहे. दुचाकी चालविणारे आणि पादचाऱ्यांच्या अपघाती मृत्यूचे प्रमाण मोठे असल्याचे निरीक्षण जिल्हा प्रशासनाच्या बैठकीत नोंदविले आहे. विविध ठिकाणची पोलिस ठाणी, 'आरटीओ', राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडील माहितीच्या आधारे राज्य सरकारने 'ब्लॅक स्पॉट'बाबतचा अहवाल तयार केला आहे. मुंबई-बेंगळुरू महामार्गावरील नवले पुलावरील अपघातांची संख्या वाढल्याचे समोर आले होते. याचे गांभीर्य ओळखून जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी पुढाकार घेऊन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय), प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) आणि पोलिसांच्या माध्यमातून तेथे गेल्या तीन ते चार महिन्यांत विविध उपाययोजना राबविल्या. त्यामुळे नवले पुलावर होणारे अपघात दोन महिन्यांत कमी झाल्याचे निरीक्षण अधिकाऱ्यांनी नोंदविले आहे.

### कमी अपघात होणारी ठिकाणे

» शहरातील कमी अपघात होणाऱ्या ठिकाणांची माहिती अहवालात दिली आहे. त्यात पुणे शहरातील शिवाजीनगर भागातील अन्य परिसर, विमानतळ, कोंढवा, येरवडा, हिंजवडी, तळेगाव दाभाडे, देहूरोड या ठिकाणी सर्वाधिक कमी अपघात होत आहे. यात विमानतळ, येरवडा येथील विविध ठिकाणांवर लक्ष्य केंद्रित करण्यात आले आहे. सध्या अनेक भागांमध्ये कमी अपघात होत असले तरी वाढत्या वाहतूक कोंडी आणि वाहनांमुळे त्या ठिकाणी अपघातांची संख्या वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

" राज्य सरकारने पुणे जिल्ह्यातील ६३ अपघातांच्या ठिकाणांचा अहवाल पाठविला आहे. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग, 'एनएचएआय', रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारितील येणाऱ्या विविध रस्त्यांवरील सर्वाधिक अपघात होत असलेल्या ठिकाणांचे सर्वेक्षण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**– बप्पा बहीर,**
अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

# चांदणी चौकात पादचारी मार्गाबरोबर पादचारी पूलही उभारण्यात येणार

## महापालिका प्रशासनाकडून आराखडा तयार

**| पुणे | महाईन्यूज |**

**चांदणी चौकातील उड्डाणपुलानंतरही पादचाऱ्यांना रस्ता ओलांडण्यास अडथळा निर्माण होत असल्याने चार किलोमीटर लांबीचा पादचारी मार्ग करण्याचे नियोजित आहे. पादचारी मार्गाबरोबरच पादचारी पूलही उभारण्यात येणार असून, त्याबाबतचा आराखडा महापालिका प्रशासनाकडून तयार करण्यात आला आहे. महापालिका आणि राष्ट्रीय राज्य महामार्ग प्राधिकरणाच्या बैठकीत त्याबाबतचा निर्णय घेण्यात येणार आहे.**



चांदणी चौकातील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून उड्डाणपूल उभारण्यात आला आहे. या उड्डाणपुलाचे उद्घाटन केंद्रीय भुपृष्ठ आणि दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते गेल्या महिन्यात करण्यात आले. मात्र या उड्डाणपुलामुळे पादचाऱ्यांना रस्ता ओलांडण्यास असंख्य अडचणी येत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे त्याबाबतचा आराखडा महापालिका प्रशासनाकडून करण्यात आला आहे.

महापालिकेने यासाठी चांदणी चौकात अभ्यास करून समस्या आणि सुधारणा याचा आराखडा तयार केला आहे. महापालिकेला पादचारी मार्ग बांधण्यासाठी सुमारे १५ कोटी तर महामार्ग प्राधिकरणाला पादचारी पूल बांधण्यासाठी सुमारे १० कोटींचा खर्च अपेक्षीत आहे. असा एकूण २५ कोटींचा खर्च अपेक्षित आहे.

### आराखड्यासंदर्भात बैठकीचे आयोजन

» चांदणी चौक परिसरातील रस्त्यावर पादचारी मार्ग बांधणे, महामार्ग ओलांडण्यासाठी पादचारी पुलाची उभारणी, पादचारी पुलावर ये-जा करण्यासाठी जीने, बावधन ते कोथरूड या दरम्यान महामार्गाल समांतर पादचारी पूल, वेद भवनाच्या जवळ रस्ता ओलांडण्याची सुविधा असा हा आराखडा आहे. या आराखड्यासंदर्भात महापालिका आणि महामार्ग प्राधिकरणाची येत्या काही दिवसांत एकत्रित बैठक होणार आहे. महापालिकेकडून त्यांच्या हिश्शाचा खर्च देण्याची भूमिका घेण्यात आली आहे.

# कमी पटसंख्येच्या शाळांवर घाला!

## गाव तिथे शाळा या संकल्पनेला आता छेद जाणार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शाळेतील कमी पटसंख्या, त्यामुळे विद्यार्थ्यांना आवश्यक सोयीसुविधा पुरवण्यात येणाऱ्या अडचणी, कमी पटसंख्येमुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक भावना निर्माण न होणे अशी कारणे देत राज्य सरकारने २० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळा समूह शाळांमध्ये रुपांतरित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे गाव तिथे शाळा या संकल्पनेला आता छेद जाणार असून, समूह शाळांचे प्रस्ताव सादर करण्यासाठी १५ ऑक्टोबरची मुदत देण्यात आली आहे.**



शिक्षकांची खासगी कंपन्यांमार्फत कंत्राटी भरती, खासगी कंपन्यांकडून सीएसआर निधी घेऊन त्यांची नावे शाळांना देण्याच्या शिक्षण विभागाच्या निर्णयावर आधीच टीकेची झोड उठली आहे. त्या पाठोपाठ आता समूह शाळांचा विषय पुढे आला आहे. शिक्षण विभागाच्या आकडेवारीनुसार राज्यात १ ते २० पटसंख्येच्या १४ हजार ७८३ शाळा आहेत. त्यात १ लाख ८५ हजार ४६७ विद्यार्थी, तर २९ हजार ७०७ शिक्षक आहेत.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कमी पटसंख्येच्या शाळा बंद करून, समूह शाळा निर्माण करण्याची प्रक्रिया राबवण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी परिपत्रकाद्वारे राज्यातील सर्व शिक्षण उपसंचालक आणि शिक्षणाधिकारी यांनी समूह शाळा विकसित करण्याचे आदेश दिले आहेत. नंदूरबार जिल्ह्यातील तोरमाळ, तर पुणे जिल्ह्यातील पानशेत येथे निर्माण करण्यात आलेल्या समूह शाळांच्या धर्तीवर राज्यात समूह शाळा विकसित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. समूह शाळेमध्ये नवीन शैक्षणिक धोरण, इतर अभ्यासगटांनी दर्जेदार शिक्षणासाठी सुचवलेल्या १८ पायाभूत सुविधा, पहिली ते पाचवीसाठी प्रत्येक वर्गासाठी स्वतंत्र शिक्षक आणि इयत्ता सहावी ते आठवीपर्यंत प्रत्येक विषयासाठी त्या विषयाचे विषय तज्ञ शिक्षक उपलब्ध असतील याबरोबर संगणक खेळ व इतर कला यासाठी स्वतंत्र शिक्षक, प्रत्येक इयत्तेसाठी स्वतंत्र वर्ग खोली, त्याचबरोबर वाचनालय, संगणक कक्ष, विज्ञान प्रयोगशाळा, विविध कला संगीत यांसाठी बहुउद्देशीय कक्ष, खेळाचे मैदान-साहित्य, विद्यार्थी वाहतुकीसाठी बससेवा उपलब्ध करण्याबाबत नमूद करण्यात आले आहे. राज्य शासनाचा निर्णय शिक्षण हक्क कायद्याचे (आरटीई) उल्लंघन करणारा आहे.

समूह शाळेमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या घरापासून १ किंवा ३ किलोमीटरच्या आत शाळा उपलब्ध होणार नाही. त्यामुळे या निर्णयावर शिक्षण क्षेत्रातून टीका करण्यात येत आहे. क्लस्टर शाळा सुरू करण्यामागे राज्य शासनाचा शाळा बंद करणे किंवा शिक्षकांची पदे कमी करण्याचा उद्देश नाही. तर गुणवत्तेच्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांना पुरेशा प्रमाणात शैक्षणिक सुविधा मिळाव्यात आणि त्यांच्यामध्ये शिक्षणातील विविध अध्ययन क्षमता विकसित होण्यास वाव मिळण्याचा उद्देश्य आहे, असे राज्याचे शिक्षण आयुक्त सुरज मांढरे यांनी प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे. कमी पटसंख्येच्या शाळांतील विद्यार्थ्यांचे सामाजिकीकरण होत नाही हे कोणी सिद्ध केले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळा खाजगी उद्योगांना दत्तक देणे आणि कमी पटसंख्येच्या शाळा नजीकच्या शाळेत समाविष्ट करणे हे निर्णय गोरगरीबांचे, ग्रामीण भागातील सरकारी शाळांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे नुकसान करणारे आहे. शिक्षण हक्क कायद्याला पायदळी तुडवणाऱ्या धोरणाचा निषेध आहे, असे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य अध्यक्ष विजय कोंबे यांनी सांगितले.

### विद्यार्थी वाहतुकीसाठी बससेवा उपलब्ध

या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी परिपत्रकाद्वारे राज्यातील सर्व शिक्षण उपसंचालक आणि शिक्षणाधिकारी यांनी समूह शाळा विकसित करण्याचे आदेश दिले आहेत. नंदूरबार जिल्ह्यातील तोरमाळ, तर पुणे जिल्ह्यातील पानशेत येथे निर्माण करण्यात आलेल्या समूह शाळांच्या धर्तीवर राज्यात समूह शाळा विकसित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. समूह शाळेमध्ये नवीन शैक्षणिक धोरण, इतर अभ्यासगटांनी दर्जेदार शिक्षणासाठी सुचवलेल्या १८ पायाभूत सुविधा, पहिली ते पाचवीसाठी प्रत्येक वर्गासाठी स्वतंत्र शिक्षक आणि इयत्ता सहावी ते आठवीपर्यंत प्रत्येक विषयासाठी त्या विषयाचे विषय तज्ञ शिक्षक उपलब्ध असतील याबरोबर संगणक खेळ व इतर कला यासाठी स्वतंत्र शिक्षक, प्रत्येक इयत्तेसाठी स्वतंत्र वर्ग खोली, त्याचबरोबर वाचनालय, संगणक कक्ष, विज्ञान प्रयोगशाळा, विविध कला संगीत यांसाठी बहुउद्देशीय कक्ष, खेळाचे मैदान-साहित्य, विद्यार्थी वाहतुकीसाठी बससेवा उपलब्ध करण्याबाबत नमूद करण्यात आले आहे.

# महापालिका-जलसंपदामध्ये पाण्यावरून शीतयुद्ध!

## पालिका प्रशासनाकडून जलसंपदा विभागाकडे वाढीव पाण्याची मागणी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहराची लोकसंख्या ७१ लाखांच्या घरात असल्याने वाढीव पाण्याची मागणी महापालिका प्रशासनाकडून जलसंपदा विभागाकडे करण्यात आली आहे. मात्र लोकसंख्येचा फुगवटा दाखविताना पाणीगळतीकडे महापालिका प्रशासनाकडून सोयीस्कर दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे.**

शहरातील जुन्या आणि जीर्ण जलवाहिन्यांतून पाण्याची गळती होण्याचे प्रमाण सर्वाधिक असून शहरातील २५० किलोमीटर मुख्य जलवाहिन्यांपैकी ६० किलोमीटर अंतरातील जलवाहिन्यांतून पाणी गळती होत आहे. समान पाणीपुरवठा योजनेमुळे गळती रोखली जाईल, असा दावा केला जात असला तरी गळती रोखली जाणार नसून गळतीचे प्रमाण अल्प प्रमाणात कमी होणार आहे. त्यामुळे भविष्यात वाढत्या लोकसंख्येला पाणीपुरवठा करण्याचे आव्हान महापालिका प्रशासनापुढे असणार आहे. शहरात महापालिकेकडून समान पाणीपुरवठा योजना राबविली जात आहे. त्यासाठी शहराची विभागणी काही भागात करण्यात आली असून प्रत्येक भागासाठी स्वतंत्र जलवाहिनीद्वारे पाणीपुरवठा करण्याचे नियोजित आहे. जलवाहिनीवरील पाणीगळती



रोखण्यासाठी जलकेंद्रातून मुख्य जलवाहिनीत सोडण्यात येणारे पाणी फ्लो मीटरद्वारे मोजले जात असून त्यामुळे जलवाहिनीत सोडलेले पाणी आणि प्रत्यक्षात पोहोचणारे पाणी याची माहिती महापालिका प्रशासनाला मिळत आहे. त्यातून साठ किलोमीटर लांबीच्या जलवाहिन्यांमध्ये गळती असल्याचे आणि त्यातून लाखो लिटर पाणी वाहून जात असल्याचे महापालिका अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले आहे. त्यानुसार महापालिकेकडून उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत. पुण्यासाठी वार्षिक ११ अब्ज घनफूट (टीएमसी) पाणी मंजूर आहे. मात्र, प्रत्यक्षात महापालिका वार्षिक २० टीएमसी पाणी धरणातून घेते. त्यापैकी तब्बल चार टीएमसी पाण्याची जलवाहिन्यांतून गळती होते. म्हणजेच शहराला चार महिने पुरेल, एवढे पाणी सदोष वितरण प्रणालीमुळे वाया जात असल्याचे निदर्शनास आले आहे. जुन्या आणि जीर्ण जलवाहिन्यांमुळे पिण्याच्या पाण्याची तब्बल चाळीस टक्के गळती होत असल्याच्या वास्तवाकडे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून सातत्याने दुर्लक्ष करण्यात येत आहे. वर्षानुवर्षे ही गळती होत असताना ठोस उपाययोजना कागदावरच राहिल्या असून महापालिकेची भिस्त समान पाणीपुरवठा योजनेवरच आहे.

### नियंत्रित राहणार पाण्याचा वापर

समान पाणीपुरवठा योजनेमुळे गळती रोखण्यास मदत होणार आहे. या योजनेमुळे सर्व भागाला समन्यायी पद्धतीने पाणीपुरवठा होणार असून जलमापकांमुळे पाण्याचा वापरही नियंत्रित राहणार आहे', असे समान पाणीपुरवठा योजनेचे अधीक्षक अभियंता नंदकिशोर जगताप यांनी म्हटले आहे. शहराची लोकसंख्या २०४७ मध्ये १ कोटीपेक्षा जास्त होणार आहे. पाणीपुरवठ्याचे मर्यादित स्रोत पाहता या लोकसंख्येला पाणीपुरवठा करण्याचे आव्हान भविष्यात महापालिकेपुढे असणार आहे.

# रिपाइ शहराध्यक्ष निवडीला वेग!

## राजकारण: क्रियाशील सभासद नोंदणीला सुरुवात

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (आठवले गट) पिंपरी-चिंचवड शहराध्यक्षपद निवडीच्या प्रक्रियेला वेग आला आहे. एक महिन्याच्या आत नवीन शहराध्यक्ष मिळणार आहे. सध्या क्रियाशील सभासद नोंदणी करण्यात येत आहे. त्यानंतर इच्छुककांकडून अर्ज मागविण्यात येणार आहेत. त्यानंतर चर्चा करून अध्यक्षाची निवड करण्यात येणार आहे.**



जुलै 2023 मध्ये रिपाई पक्षाची नवीन नोंदणी करण्यात आली. त्यामुळे राज्याभरातील कार्यकारिणी बरखास्त करून नव्याने कार्यकारिणी निवडीच्या प्रक्रिया सुरू करण्यात आल्या आहेत. पिंपरी-चिंचवड शहरातील शहराध्यक्ष पदाच्या निवडीसाठी देखील प्रक्रिया गतीमान झाली आहे.

सुरूवातीच्या टप्प्यात क्रियाशील सभासद होण्याची अट घालण्यात आली आहे. 50 साधे सभासद करणाऱ्यालाच क्रियाशील सभासद होता येणार आहे. या क्रियाशील सभासदालाच पक्षाच्या पदांवर काम करता येणार आहे.

### ... तर केंद्रीय मंत्री आठवले निर्णय घेणार!

पक्षाकडून नवीन सभासद नोंदणीसाठीची दिलेली मुदत संपली होती. मात्र 15 दिवस मुदत वाढवून देण्यात आली. 18 सप्टेंबरपासून विविध पदांवर काम करणाऱ्या इच्छुकांचे अर्ज मागविले जाणार आहेत. आलेल्या अर्जांपैकी सर्व इच्छुकांशी शहरांतर्गत पक्षीय पातळीवर सामोपचाराने चर्चा केली जाणार आहे. पदांवर नियुक्तीबाबत चर्चा होणार आहे. या मध्ये मतभेद झाल्यास आलेली नावे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्याकडे पाठविण्यात येणार आहेत. त्यानंतर त्यांच्याकडून अध्यक्षपदाचा अंतिम निर्णय घेतला जाईल, अशी माहिती पक्षाकडून देण्यात आली.

### 15 जागांवर दावा...

भाजपाच्या सत्तेत आरपीआय सहभागी आहे. पिंपरी चिंचवड शहरात पक्षाची मोठी ताकद आहे. पिंपरी विधानसभेच्या निवडणुकीत उमेदवार दुसऱ्या क्रमांकावर राहिला आहे. पक्षाची असणारी ताकद पाहता आगामी महापालिका निवडणुकीत सत्ताधारी मित्र पक्षांकडे 15 जागा मागण्याची शक्यता आहे.

---

# पुनवळे कचरा डेपोचा चेंडू फडणवीसांच्या कोर्टात!

## आमदार अश्विनी जगताप यांचा पुढाकार

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पर्यावरणपूरक मी पुनावळेकर या मोहिमेच्या शिष्ट मंडळाने चिंचवड विधानसभेच्या विद्यमान आमदार अश्विनीताई जगताप यांची भेट घेतली. त्यावेळी पुनावळे येथे होत असणाऱ्या प्रस्तावित "घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प रद्द" करण्याबाबत चर्चा करण्यात आली. लवकरच आमदार अश्विनी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली कचराडेपो विरोधी शिष्टमंडळ मुंबई येथे जाऊन महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांची भेट घेणार आहेत.**

पुनावळे व परिसरातील जवळपास २०० रहिवासी हौसींग सोसायटीचे " प्रस्तावित "घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प रद्द" करण्याबाबतचे ठराव उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देणार आहेत.

### मुंबईला शिष्टमंडळसह उपमुख्यमंत्र्यांची भेट घेणार!



### घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास विरोध

पुनावळे परिसरातील जवळपास ५०,००० हजार सभासदाचा, प्रस्तावित "घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास विरोध आहे. उपमुख्यमंत्री फडणविसांनी लक्ष घालून हा प्रकल्प रद्द करावा, अशी विनंती करणार आहेत.

### कचरा डेपोला का आहे विरोध?

कचरा डेपो झाल्यास झाडे तोडावी लागतील. त्यामुळे वन विभागाला झाडे लावण्यासाठी जागा देणे बंधनकारक आहे. महापालिकेने आत्तापर्यंत वनीकरणासाठी तीन कोटी 57 लाख 13 हजार रूपये वेळोवेळी अदा केले आहेत. पुनावळेत गृहप्रकल्प झाल्याने बांधकाम व्यावसायिक, राजकारणी, स्थानिकांचा कचरा डेपोला विरोध आहे. त्यामुळे कचरा डेपोची जागा ताब्यात घेण्यात पालिकेला यश आले नाही.

---

# कर संकलन विभागाचा आज कर संवाद

## युपिक आयडी, सर्वेक्षणाची मालमत्ता धारकांना मिळणार सविस्तर माहिती

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील मालमत्ता धारकांसाठी सातत्याने नव-नवीन उपक्रम राबवणाऱ्या कर संकलन व कर आकारणी विभागाचा कर संवाद दिवसेंदिवस यशस्वी होत आहे. या कर संवादमध्ये मालमत्ता धारकांचे प्रश्न 'ऑन दी स्पॉट' सोडविण्यात येत आहेत. उद्या शनिवारी (दि. 23) सकाळी साडे अकरा वाजता कर संवादचे आयोजन करण्यात आले आहे. या संवादमध्ये प्रामुख्याने युपिक आयडी, मालमत्ता सर्वेक्षण, करामधील सवलत याबद्दल माहिती देण्यात येणार आहे, असे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी सांगितले आहे.**





### कमेंट बॉक्समध्ये आजही विचारु शकता प्रश्न

उद्याच्या कर संवाद संदर्भात कर संकलन विभागाच्या वतीने फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करण्यात आली आहे. मात्र, या ऑनलाईन कर संवादमध्ये ज्यांना उपस्थित रहाणे शक्य नसेल अशा नागरिकांनी फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्रामच्या कमेंट बॉक्समध्ये आपले प्रश्न आजच विचारु शकता. या प्रश्नाची उत्तरे कर संवादमध्ये देण्यात येतील.

करदात्यांचे विविध प्रश्न, त्यांना करासंदर्भात येणाऱ्या अडचणी, मनातील शंकांची सोडवणूक करण्यासाठी जन संवाद सभेच्या धर्तीवर ऑनलाइन पध्दतीने 'कर संवाद'चे आयोजन करण्यात येते. हा संवाद फेसबुक, युट्यूबच्या माध्यमातून होणार आहे. तसेच ज्यांना ऑनलाईन उपस्थित राहता येणार नाही, अशा नागरिकांनी महापालिकेमधील कर संकलन विभागाच्या कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित रहावे. या कर संवादमध्ये पालिकेच्या वतीने सुरू असलेल्या मालमत्ता सर्वेक्षणाची आणि मालमत्तांना युपिक आयडी (युनिक प्रॉपर्टी आयडेंटिफिकेशन कोड म्हणजेच विशिष्ट मालमत्ता क्रमांक) इत्यंभूत माहिती देण्यात येणार आहे.

महापालिकेच्या सर्व सेवा तसेच शासनाचे इतर विभाग यांच्यात समन्वय राहण्यासाठी या युपिक आयडीचा वापर केला जाणार आहे. सध्या देशात व्यक्तीचा जसा आधार क्रमांक हा युपिक आयडी म्हणून वापरला जातो, तसाच आता मालमत्तांसाठी युपिक आयडी वापरला जाणार आहे. त्यामुळे मालमत्तेची सर्व माहिती व मालमत्तेशी निगडित सर्व सेवा एकाच क्लिकवर उपलब्ध होणार आहेत. याचा नागरिकांना कसा फायदा होणार आहे, याबाबत सर्व माहिती देण्यात येणार आहे.




# द्यायचे आहे, पण द्यायचे नाही!

**काहीच नसण्यापेक्षा काहीतरी असणे चांगले..' ही माझी प्रतिक्रिया होती नुकत्याच लोकसभेत संमत झालेल्या महिला आरक्षण विधेयकाबाबत. स्वातंत्र्योत्तर भारतातील सर्वात दूरगामी सुधारणांपैकी ही एक सुधारणा. गेली १३ वर्षे थंडपणे गेली आणि आता त्या मसुद्यातील त्रुटी सुधारण्यासाठी पुरेसा वेळ न देता तो संमत करण्याची घाई केली गेली आहे.**

या विधेयकाला शेवटच्या क्षणी डिलिमिटेशन म्हणजेच मतदारसंघांच्या पुनर्रचनेचे वळण देण्यात आले. प्रत्येक ऐतिहासिक घटनेला काहीतरी गालबोट असतेच. या ऐतिहासिक घटनेला अविश्वास, कपटीपणा आणि ढोंगीपणाचे गालबोट होते. भारतीय राजकारण पूर्णपणे पुरुषप्रधान आहे. महिला सहभागाबद्दलच्या परिस्थितीचे मूल्यांकन करण्याचे कोणाला काही पडलेले नाही. महिला आरक्षण विधेयकाच्या बाजूचे खासदार असोत की विरोधातले, महिलांचा राजकीय सहभाग वाढावा यासाठीच्या संस्थात्मक रचनेच्या राजकीय परिणामांचा ते विचारच करत नाहीत. आपणा इतक्या वर्षांत काय मिळवले आहे तर महिला आरक्षण नेमके कसे साध्य करता येईल आणि कधी या मूलभूत प्रश्नांची उत्तरे देण्यात अपयशी ठरलेली गलथान यंत्रणा. संसदेत आणि विधानसभांमध्ये महिलांसाठी एकतृतीयांश जागांची आपल्याला



या विधेयकातून हमी दिली गेली आहे. परंतु भर्तृहरी महताब या बीजेडीच्या खासदारांनी घाईघाईने तयार आलेल्या या या दुरुस्तीच्या मसुद्यात असलेल्या या संदिग्धतेकडे बोट दाखवले आहे. आताचे विधेयक असे म्हणते की 'लोकसभेच्या थेट निवडणुकीद्वारे भरल्या जाणाऱ्या एकूण जागांपैकी एकतृतीयांश जागा महिलांसाठी राखीव असतील.' प्रत्येक राज्यासाठी एकतृतीयांश कोटा मोजला जाईल असे त्यात नमूद केलेले नाही. त्यामुळे, बहुधा, लोकसभेच्या अर्ध्या जागा एका राज्यात महिलांसाठी राखीव ठेवल्या जाऊ शकतात, तर दुसऱ्या राज्यात एकही जागा असू शकत नाही! या मूर्खपणामुळे कायदामंत्री भडकले. मतदारसंघ पुनर्रचना आयोग अशा समस्यांचे निराकरण करेल असे म्हणत गृहमंत्र्यांनी ते बाजूला ठेवले. एकतृतीयांश आरक्षण कसे दिले जाईल याबाबत या कायद्यात स्पष्टता नाही. पण यात नवीन काहीच नाही. महिलांना आरक्षण नेमके कसे द्यायचे या उदिद्ष्टाकडे सुरुवातीपासूनच दुर्लक्ष केले गेले आहे. जातीवर आधारित आरक्षण हे जसे सामाजिक न्यायाचे एकमेव साधन ठरले आहे, तसेच भौगोलिक आरक्षण ही राजकारणातील स्त्री-पुरुष समानतेची प्रतिक्षिप्त मागणी आहे.

२५ वर्षांहून अधिक काळ, महिला आरक्षण विधेयकाच्या समर्थकांनी महिला आरक्षण विधेयकासदर्भातील प्रादेशिक आरक्षण विषयीच्या आक्षेपांचा प्रतिवादच केलेला नाही. मतदारसंघांमध्ये महिलांसाठी राखीव असलेले आरक्षण आळीपाळीने फिरवले जाणार नसेल तर ते अत्यंत अन्यायकारक आणि मनमानीपणाचे आहे. हे आरक्षण आळीपाळीने मिळणार असेल तर त्याचा अर्थ असा होतो की निवडून आलेल्या महिला ज्यांना जबाबदार धरता येईल अशा राजकीय पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबातील नसतील तर निवडून आलेल्यांपैकी दोनतृतीयांश खासदारही आपली मतदारांप्रती असलेली जबाबदारीही मानणार नाहीत. या सगळय़ात काही पर्याय होते, पण ते गांभीर्याने घेतले गेले नाहीत. मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना प्रत्येक राज्यात महिलांना एकतृतीयांश तिकीट देणे अनिवार्य करणे असा एक पर्याय होता. निवडून आलेल्यांमध्ये एकतृतीयांश महिला असतील याची लगेचच हमी देता आली नसती, पण स्वतंत्र महिला नेतृत्व विकसित करण्यासाठी हा पर्याय अधिक योग्य होता. मी त्यासाठी ('लोकसत्ता' पक्षाचे जयप्रकाश नारायण आणि 'मानुषी'च्या मधू किश्वर यांच्याबरोबर) प्रयत्न केले, पण कोणीच आमची दखल घेतली नाही. मग मी आणखी एक अधिक चांगला पर्याय आला. तो होता एका पुरुष आमदाराबरोबर एक महिला प्रतिनिधीला संधी; थोडक्यात इलेक्ट वन, गेट वन फ्री. आमदारांची संख्या ३३ टक्क्यांपर्यंत पोहोचेपर्यंत प्रत्येक पक्ष त्यांच्या तिकिटावर निवडून आलेल्या आमदारांप्रमाणेच अतिरिक्त महिलांना उमेदवारी देऊ शकेल. (हे मूर्खपणाचे वाटू शकते, परंतु त्याच्या राजकीय परिणामांबद्दल फक्त दोन मिनिटे विचार करा म्हणजे तुम्हालाही कळेल की हे इतर कोणत्याही पर्यायापेक्षा जास्त चांगले आहे). पण हा पर्याय पटवून देणे अधिक अवघड होते. त्यामुळे, जागांचे आरक्षण हीच सध्याच्या परिस्थितीत आपल्याला समजेल-उमजेल अशी, त्यातल्या त्यात चांगली पद्धत असू शकते. पण या कायद्याचा आता आला आहे तो मसुदा या उपलब्ध पयार्यालाही न्याय देत नाही.

## संपादकीय »

### कॅनडाऊ त्रुदॉऊ..

***पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपले वाढलेले आंतरराष्ट्रीय वजन वापरावे आणि मागच्या दरवाजाने संपर्क साधून त्रुदॉ शांत कसे बसतील हे पाहावे.***

भारत आणि कॅनडा यांच्यात सध्या जे काही सुरू आहे त्यात बरीच गुंतागुंत आहे असे वाटत असले तरी तसे नाही. यात फक्त दोन मुद्दे महत्त्वाचे ठरतात. पहिला म्हणजे कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन त्रुदॉ म्हणतात त्या प्रमाणे खलिस्तानवादी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येत खरोखरच भारताचा हात आहे किंवा काय..

याचे उत्तर काय असेल हे गृहीत धरणे अवघड. कारण असे काही आपण करतच नाही, असे म्हणणे अगदीच भाबडेपणाचे. लोकशाही देश एकमेकांचे मित्र असले तरी एकमेकांवर हेरगिरी करीत असतातच हे नाकारण्यात अर्थ नाही. म्हणजे अमेरिका आणि इंग्लंड हे एकमेकांचे घनिष्ठ सहकारी असले तरी त्यांच्यातही हेरगिरी होतच असते. तथापि गुप्त माहिती मिळवण्याचे असे प्रयत्न सुरू असले तरी त्याबाबत एक किमान पथ्य पाळले जाते.

**सांप्रती भारतातील १४० कोटी व महाराष्ट्रातील १४ कोटी लोकांसाठी करण्यात येत असलेल्या विकास योजनाचा जयघोष जोरात आहे. जी-२० समूहाच्या दिल्ली येथील परिषदेत पंतप्रधान मोदी यांच्या निवेदनाचा सूरनूर बघता भारत 'महासत्ता' बनला असून दारिद्र्य, कुपोषण, अभावग्रस्तता, विषमता, हिंसा. बेरोजगारी या समस्यांवर मात करण्यात आली आहे...**

## मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्यांचा विसर...

विशेष म्हणजे येत्या तीन वर्षांत भारत पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था होणार असून त्यात महाराष्ट्राचा हिस्सा एक ट्रिलियन म्हणजे एक लाख कोटी डॉलर असेल, असे शिदे-फडणवीस वारंवार सांगत आहेत! अशा पार्श्वभूमीवर मराठवाडा मुक्तीसंग्रामाच्या अमृतमहोत्सवप्रसंगी १६ सप्टेंबरला झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मराठवाडा विभागासाठी ५९ हजार कोटी रुपयांचे एक पॅकेज जाहीर करण्यात आले. यात प्रामुख्याने सिंचन प्रकल्प, वॉटर ग्रिड, पश्चिमेतील नद्यांचे पाणी वळविणे व अन्य काही बांधकाम प्रकल्पांचा समावेश आहे. यातून कष्टकरी जनतेच्या नेमके किती व काय पदरी पडेल?

या विभागाचे क्षेत्रफळ ६५ लाख हेक्टर असून २०२२ साली लोकसंख्या सव्वादोन कोटी असून ते राज्याच्या अनुक्रमे २१% व १६% आहे. यंदा संपूर्ण ऑगस्ट महिना कोरडा गेल्यामुळे व सप्टेंबर महिन्यात देखील सर्वत्र सरासरी भरून काढील एवढा पाऊस न झाल्यामुळे खरीप पिकाला फटका



बसला आहे. परिस्थिति सुधारली नाही तर रब्बी देखील धोक्यात असेल! शेतीची कुंठित अवस्था व शेतकरी-शेतमजुरांची दैन्यावस्था ही विभागातील अव्वल समस्या असून गत १२ वर्षात दहा हजाराहून अधिक शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची नौबत आली. खरेतर याकडे शासनाचे लक्ष वेधणारा अहवाल विभागीय आयुक्तलयाने सादर केला आहे. दहा लाख शेतकऱ्यांच्या सर्वेक्षणावर आधारित या अहवालात एक बाब प्रकर्षाने समोर आली की यापैकी लाखाहून अधिक शेतकरी हतबल, हताश निराश होऊन आत्महत्येला कवटाळण्याच्या मानसिकतेत आहे. असे असताना सरकारने या अहवालाची दखल का घेतली नाही, हा एक गंभीर प्रश्न आहे. एवढ्या गंभीर समस्येबाबत मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री अथवा मंत्रिमंडळाने कोणतेही वक्तव्य व कार्यवाही न करणे हे कशाचे घोतक आहे? थोडीथोडकी नव्हे दहा हजार (१०,०००) शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची मजबूरी ओढवणे हेच मुळी शिवाजी-शाहू-फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्राला अत्यंत नामुष्कीचे आहे. महाराष्ट्रातील ३५० आमदार व पन्नासेक खासदार असलेल्या ४०० लोकप्रतिनिधीपैकी बहुसंख्य ग्रामीण भाग व शेतकरी जाती-वर्गातून येतात त्यांना हा प्रश्न अव्वल महत्त्वाचा, सर्वोच्च प्राधान्याचा का वाटत नाही? ताज्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रातील ८० टक्के शेतकऱ्यांचे, शेतमजुरांचे दहमहा कौटुंबिक उत्पन्न दहा हजार रुपयांपेक्षा कमी आहे. मात्र, आमचे बहूसंख्य लोकप्रतिनिधी कोट्यधीश (बरेच महाभाग अब्जाधीश) आहेत. ते लाखो रुपये किमतीच्या मोटारगाड्या व तारांकित संरजामात वावरतांना लोक बघत असतात! मंत्रीमंळडाच्या बैठकीनिमित्त शंभरदोनशे मोटारगाड्या होत्याच की दिमतीला!

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शेतकऱ्यांना सिबिल मागणाऱ्या किती बँकांवर कारवाई केली : सुप्रिया सुळे

## » शेतकऱ्यांचा बँकेतच विष पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात शेतकऱ्यांना सिबिल मागणाऱ्या किती बँकांवर एफआयआर दाखल केले याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी द्यावी. औंढा तालुक्यातील भुजंग पोलिस प्रकरणात शासन बँकेवर कारवाई करणार का असा सवाल खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केला आहे.**

औंढा तालुक्यातील जोडपिंपरी येथील शेतकरी भुजंग पोले यांनी बँकेत विषारी औषध घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. याबाबतचे सविस्तर वृत्त दिव्य मराठी ने प्रसिद्ध केले. त्यानंतर खासदार सुळे यांनी सुधारित वृत्त उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवून सोशल मीडियाच्या माध्यमातून सवालही उपस्थित केला.

खासदार सुळे यांनी फेसबुक पोस्टमध्ये नमूद की, औंढा तालुक्यातील जोडपिंपरी येथील शेतकरी भुजंग माणिकराव पोले हे शेतकरी बँकेत पीककर्ज मागण्यासाठी गेले असता त्यांना ते नाकारण्यात आले.

वारंवार पाठपुरावा करुनही बँकेने त्यांना कर्ज दिले नाही. अखेर कंटाळून भुजंग पोले यांनी बँकेतच विष पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. बँक आता त्यांचे सिबील खराब असल्याचे कारण देत आहे. हि कहाणी एकट्या भुजंग पोले यांची नाही. राज्यातील विशेषतः मराठवाड्यातील बहुतेक शेतकऱ्यांची हिच कहाणी आहे. पीक कर्जात थकितचे प्रमाण



वाढल्याचे कारण देऊन कर्ज मंजूरीचे अधिकार बँकांनी आपल्या झोनल कार्यालयांना दिले आहेत. परिणामी कर्ज मंजूर व्हायला अडचणी येतात. अशी कित्येक प्रकरणे झोनल कार्यालयांमध्ये प्रलंबित आहेत.

शेतीच्या कामासाठी वेळेत कर्जपुरवठा न झाल्याने शेतकरी नाईलाजाने बिगर बँकिंग संस्था, मायक्रो क्रेडिट इन्स्टिट्यूशनकडून चढ्या दराने कर्ज घेतात. यानंतर ते व्याजाच्या दुष्टचक्रात अडकतात.

शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी सिबील लागू करणे, बँकाची कृषी क्षेत्राबाबतची अनास्था आणि शेतकऱ्यांप्रतीचा उदासीन दृष्टीकोन यामुळे हि परिस्थिती उद्भवते. हे एकंदर पतपुरवठा करणाऱ्या व्यवस्थेचे अपयश आहे. वास्तविक मे 2023 मध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अमरावती येथे बोलताना शेतकऱ्यांना सिबील मागणाऱ्या बँकांवर एफआयआर दाखल करण्याचे आदेश दिले होते. हि घोषणा केल्यानंतर आजवर किती बँकांवर कारवाई करण्यात आली याची माहिती उपमुख्यमंत्री महोदयांनी जाहिर करणे आवश्यक आहे. किमान भुजंग पोले यांच्याप्रकरणी तरी शासन संबंधित बँकेवर कारवाई करणार आहे का?

### आजवर किती बँकांवर कारवाई

» शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी सिबील लागू करणे, बँकाची कृषी क्षेत्राबाबतची अनास्था आणि शेतकऱ्यांप्रतीचा उदासीन दृष्टीकोन यामुळे हि परिस्थिती उद्भवते. हे एकंदर पतपुरवठा करणाऱ्या व्यवस्थेचे अपयश आहे. वास्तविक मे 2023 मध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अमरावती येथे बोलताना शेतकऱ्यांना सिबील मागणाऱ्या बँकांवर एफआयआर दाखल करण्याचे आदेश दिले होते. हि घोषणा केल्यानंतर आजवर किती बँकांवर कारवाई करण्यात आली याची माहिती उपमुख्यमंत्री महोदयांनी जाहिर करणे आवश्यक आहे. किमान भुजंग पोले यांच्याप्रकरणी तरी शासन संबंधित बँकेवर कारवाई करणार आहे का?

एकिकडे कार्पोरेटसची अब्जावधी रुपयांची कर्जे राईट ऑफ करायची आणि जगाच्या पोशिंद्याला शेतीसाठी पैसा देताना ताटकळत उभा करायचे हा विरोधाभास बरा नाही. असेही खासदार सुळे यांनी नमूद केले आहे. या प्रकरणात आता राज्य शासनाकडून काय भूमिका घेतली जाणार याकडे हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# पंतप्रधानांना लोकांच्या स्वप्नाशी काहीही देणे-घेणे नाही!

## » सध्या अजितदादांचे खच्चीकरण सुरू: विजय वडेट्टीवार यांचे वक्तव्य

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आमदार अपात्रतेबाबतचा मुद्दा सध्या न्यायालयीन प्रक्रियेमध्ये आहे. मात्र आता अजित दादांचं खच्चीकरण चालले आहे. गोपीचंद पडळकर सारखा सत्ता पक्षातला आमदार त्यांना काय काय बोलतो. मात्र सत्तेसाठी लाचारी करणारे त्यावर कसे उत्तर देतील, असा सवाल विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला आहे.**

दरम्यान, विजय वडेट्टीवार पुढे बोलताना म्हणाले की, सत्तेसाठी लाचारी करणारे टीकेवर उत्तर कसे देतील हे महाराष्ट्र पाहतोय. मात्र ते उत्तर देऊ शकले नाही. यामुळे रोहित पवार बोलते ते सत्य आहे, रोहित पवार म्हणाले होते की, अजित पवार गटात सामील होण्यासाठी आमदारांना ब्लेकमेल करण्यात येत आहेत.

दोन दिवसांपूर्वीच भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर वादग्रस्त टीका केली होती. पडळकरांनी अजित पवारांना लबाड लांडग्याचं पिल्लू असे म्हटले होते. यावरून विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मोठा दावा केला आहे. विजय वडेट्टीवार म्हणाले की, दरम्यान आमदार अपात्रतेबाबत अध्यक्ष वेळकाढूपणा करत आहेत. एका



विशिष्ट पक्षाचा अध्यक्ष असल्यामुळे सरकार वाचवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे निकाल आल्यानंतरही वेळ काढूपणा होत आहे. निकाल काही लागो, पण तो लवकर झाला पाहिजे. देशाच्या पंतप्रधानांनी त्यांचे स्वप्न पूर्ण केले आहे, लोकांच्या स्वप्नाशी त्यांना काहीही देणे- घेणे नाही. लोकसभेचे नवीन सभागृह बांधले आहे. त्यामध्ये या सरकारला पुढच्या काळात जनता प्रवेश करू देणार नाही, हे त्यांचे शेवटचे अधिवेशन ठरेल. ओबीसींच्या विविध मागण्यांसाठी राज्यभर सुरू असलेल्या आंदोलनांकडे विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मुख्यमंत्री

### ओबीसी संघटनांसोबत बैठक घ्या

» ओबीसींच्या विविध मागण्यांसाठी राज्यभर सुरू असलेल्या आंदोलनांकडे विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे लक्ष वेधले. गुरुवारी मुख्यमंत्र्यांना फोन करीत आपण मराठा समाजाच्या आंदोलनाला भेट दिली, मग ओबीसींच्या मागण्यांकडे दुर्लक्ष का करता, त्यांची बैठक का घेत नाही, असा प्रश्न उपस्थित करीत ओबीसी संघटनांसोबत लवकरात लवकर बैठक लावण्याची विनंती केली.

एकनाथ शिंदे यांचे लक्ष वेधले. गुरुवारी मुख्यमंत्र्यांना फोन करीत आपण मराठा समाजाच्या आंदोलनाला भेट दिली, मग ओबीसींच्या मागण्यांकडे दुर्लक्ष का करता, त्यांची बैठक का घेत नाही, असा प्रश्न उपस्थित करीत ओबीसी संघटनांसोबत लवकरात लवकर बैठक लावण्याची विनंती केली. आगामी काळात पिण्याचे पाणी, चाराटंचाईचा प्रश्न गंभीर होणार आहे. राज्य सरकारने कर्नाटकाप्रमाणे राज्यात दुष्काळ जाहीर करून हेक्टरी 25 हजारांची मदत जाहीर करावी, अशी मागणी राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी शुक्रवारी (ता. 22) केली.

# गांधी कुटुंबाला चंद्रावर पाठवायला हवे!

## » काँग्रेसला हिंदूंचा आदर करावाच लागेल : हिमंता बिस्वा सरमा

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**भाजपच्या परिवर्तन यात्रेत आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी पुन्हा एकदा गांधी कुटुंबावर निशाणा साधला. चांद्रयानवर काँग्रेसच्या वक्तव्यावर ते म्हणाले - कधी कधी मी विचार करतो की, मोदीजींना सांगावे की, एक मोठे चांद्रयान बनवून गांधी कुटुंबाला चंद्रावर पाठवून द्या. यामुळे आपल्या देशातील सर्व समस्या एकाच वेळी संपतील. काँग्रेसला हिंदूंचाही आदर करावा लागेल, असे सरमा म्हणाले. जोधपूरमध्ये जैसलमेर येथून सुरू झालेल्या परिवर्तन यात्रेच्या समारोपप्रसंगी आसामचे मुख्यमंत्री बोलत होते.**



या मेळाव्याला संबोधित करताना आसामचे मुख्यमंत्री म्हणाले–आता काँग्रेसला उत्तर देण्याची वेळ आली आहे की, काँग्रेसला भारतात राजकारण करायचे असेल तर हिंदूंचा आदर करावा लागेल.

अन्यथा आम्ही हिशेब बरोबर करून टाकू. ही गोष्ट निश्चित आहे. ते म्हणाले – नरेंद्र मोदी केंद्रात येईपर्यंत बाबर अयोध्येत जीवंत होता, मोदी आले आणि बाबर नष्ट झाला. आसाम आणि उत्तर प्रदेशात भाजपचे सरकार आल्यापासून बाबर आणि औरंगजेब यांना एका जागेवर ठेवले आहे आणि एक इंचही हलू दिले नाही. हिंदुत्वावरून गेहलोत यांच्यावर निशाणा साधत ते म्हणाले की, राजस्थानमध्ये आल्यावर कोणीतरी गेहलोत म्हणाले होते की, येथे हिंदुत्वावर राजकारण होणार नाही. मग मी म्हणालो- गेहलोत, हिंदुत्व रोखणारे तुम्ही कोण? पाच हजार वर्षांपूर्वी भारत हिंदू होता, हिंदू आहे आणि हिंदूच राहणार, तुम्ही काहीही करू शकत नाही. ज्यांनी हिंदूंना रोखण्याचा प्रयत्न केला त्यांच्याशी लढावे लागले आणि भारतात हिंदूंवर अन्याय करून जगणे तुम्हाला शक्य नाही हे समजून घ्या. तत्पूर्वी, आसामच्या मुख्यमंत्र्यांनी गुरुवारी दुपारी कोटा येथील नयापुरा स्टेडियममध्ये आयोजित सभेला संबोधित केले होते.

जोधपूर आणि कोटा या दोन्ही सभांमध्ये त्यांनी उदयपूरच्या कन्हैयालाल हत्या प्रकरणाचा उल्लेख केला. जोधपूरमध्येही याचा संदर्भ देत ते म्हणाले- आसाममध्ये अशी घटना घडली असती तर आम्ही पाच मिनिटांत निकाल लावला असता, पण राजस्थानमध्ये पीडितेच्या कुटुंबाची काळजी घेतली जात नाही. ते म्हणाले - काँग्रेस मुस्लिमांबद्दल बोलले की लगेच स्पष्टीकरण दिले जाते, ख्रिश्चनांबद्दल बोलले की समजावले जाते, पण जेव्हा हिंदूंबद्दल बोलले जाते तेव्हा काँग्रेसवाले काहीच बोलत नाहीत.

हिंदूंना शीर कसे वेगळे करायचे माहिती नाही, पण निवडणुका आल्या की ईव्हीएम मशीनद्वारे हिशेब कसा करायचा हे त्यांना नक्कीच माहिती आहे. ते म्हणाले - देशाच्या कानाकोपऱ्यात हिशेब करण्याची वेळ आली आहे आणि आपल्याला निवडणुकीत हे करायचे आहे. राजस्थान ही वीरांची भूमी आहे, त्यामुळे सनातन हिंदूंना त्यापासून वेगळे करता येणार नाही. या बैठकीत उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य यांनीही राजस्थान सरकारवर निशाणा साधला. ते म्हणाले- राजस्थानमध्ये भ्रष्टाचार आणि गुन्हेगारांचा वावर आहे. यापूर्वी यूपीमध्येही असेच होत होते. गुन्हेगार पोलिसांना घाबरवायचे, पण जेव्हापासून तेथे भाजपचे सरकार आले तेव्हापासून गुन्हेगार यूपीतून पळून गेले आहेत किंवा तुरुंगात आहेत. ते म्हणाले- आज दुर्बिणीने शोधले तरी यूपीमध्ये काँग्रेस दिसत नाही. यूपी अनेक बाबतीत पुढे आहे, पण एका बाबतीत राजस्थानच्या मागे आहे. सध्या यूपीमध्ये लोकसभेच्या 80 जागांपैकी एक खासदार काँग्रेसचा आहे, पण इथे तुम्ही भाजपच्या 25 खासदारांना विजय मिळवून दिला आहे. तुम्हाला भविष्यातही असेच करावे लागेल.

### हिशेब करता येतो

» तत्पूर्वी, आसामच्या मुख्यमंत्र्यांनी गुरुवारी दुपारी कोटा येथील नयापुरा स्टेडियममध्ये आयोजित सभेला संबोधित केले होते. जोधपूर आणि कोटा या दोन्ही सभांमध्ये त्यांनी उदयपूरच्या कन्हैयालाल हत्या प्रकरणाचा उल्लेख केला. जोधपूरमध्येही याचा संदर्भ देत ते म्हणाले- आसाममध्ये अशी घटना घडली असती तर आम्ही पाच मिनिटांत निकाल लावला असता, पण राजस्थानमध्ये पीडितेच्या कुटुंबाची काळजी घेतली जात नाही. ते म्हणाले - काँग्रेस मुस्लिमांबद्दल बोलले की लगेच स्पष्टीकरण दिले जाते, ख्रिश्चनांबद्दल बोलले की समजावले जाते, पण जेव्हा हिंदूंबद्दल बोलले जाते तेव्हा काँग्रेसवाले काहीच बोलत नाहीत. हिंदूंना शीर कसे वेगळे करायचे माहिती नाही, पण निवडणुका आल्या की ईव्हीएम मशीनद्वारे हिशेब कसा करायचा हे त्यांना नक्कीच माहिती आहे. ते म्हणाले - देशाच्या कानाकोपऱ्यात हिशेब करण्याची वेळ आली आहे आणि आपल्याला निवडणुकीत हे करायचे आहे. राजस्थान ही वीरांची भूमी आहे, त्यामुळे सनातन हिंदूंना त्यापासून वेगळे करता येणार नाही.

# आरक्षणातून जनगणना-परिसीमनची अट काढून टाका!

## » 90 वर्षांपूर्वी 52% ओबीसी होते: त्यानंतर मोजणी का झाली नाही?

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**राहुल गांधी यांनी शुक्रवारी पत्रकार परिषद घेतली. ते म्हणाले, 'महिला आरक्षण हे चांगले पाऊल आहे, मात्र त्यावर दोन अटी घालण्यात आल्या आहेत. याची अंमलबजावणी करण्यापूर्वी जनगणना आणि सीमांकन करावे लागेल. हे काम करायला बरीच वर्षे लागतील. महिला आरक्षणाची आजपासूनच अंमलबजावणी होऊ शकते, हे सत्य आहे. भाजपने या दोन्ही अटी काढून टाकाव्यात.**



राहुल पुढे म्हणाले- ही काही गुंतागुंतीची बाब नाही, पण सरकारला हे करायचे नाही. सत्य हे आहे की ते आजपासून 10 वर्षांनी लागू होईल. होईल की नाही हेही माहीत नाही. महिला आरक्षण ही वळवण्याची खेळी आहे. यातून लोकांचे लक्ष ओबीसी जनगणनेकडे वळवले जात आहे. मला भारतात किती ओबीसी आहेत हे शोधायचे आहे. जितके आहेत त्यांना भागीदारी मिळावी. त्यांनी सरकारकडे मागणी केली - जात जनगणनेसाठी गोळा केलेला डेटा सार्वजनिक करा. यावरून ओबीसी किती आहेत हे कळेल. त्यानंतर नव्याने जातनिहाय जनगणना करण्यात यावी. राहुल गांधी म्हणाले- मी संसदेत कॅबिनेट सचिवांबद्दल प्रश्न विचारला होता. मी विचारले की देशातील 90 महत्त्वाच्या अधिकाऱ्यांपैकी फक्त 3 ओबीसी का आहेत? ओबीसी अधिकारी देशाच्या बजेटच्या फक्त 5% का नियंत्रित करतात? यावर सरकारचे म्हणणे आहे की लोकसभेत ओबीसींना प्रतिनिधित्व आहे. राहुल पुढे म्हणाले- आपल्या सर्वांना माहित आहे की संसदेत कोणताही खासदार निर्णय घेऊ शकत नाही. पण त्यांच्याकडे सत्ता नाही. देश चालवण्यात त्यांचा काहीही सहभाग नाही. तुम्हाला देश चालवताना सहभाग हवा का, असा सवाल त्यांनी ओबीसी तरुणांना केला. मिळायला हवे तर तुमची लोकसंख्या फक्त 5% आहे का?

### देश सरकार चालवते, सचिव नाही

» देश चालवण्यात त्यांचा काहीही सहभाग नाही. तुम्हाला देश चालवताना सहभाग हवा का, असा सवाल त्यांनी ओबीसी तरुणांना केला. मिळायला हवे तर तुमची लोकसंख्या फक्त 5% आहे का? राहुल यांच्या प्रश्नाला अमित शहा यांनी उत्तर दिले होते. राहुल यांचे नाव न घेता ते म्हणाले की, देश सरकार चालवते, सचिव नाही. कोणत्याही एनजीओने चिट तयार करून दिली तर आम्ही सांगतो. त्यांनी सांगितले की भाजपच्या एकूण खासदारांपैकी 85 ओबीसी आहेत. भाजपच्या एकूण आमदारांपैकी 27% ओबीसी आहेत. एकूण भाजप आमदारांपैकी 40% ओबीसी आहेत.

# ॥ गौरी आवाहन ते गौरी विसर्जन ॥

**गणपती बसल्यानंतर दुसऱ्या दिवशी ऋषीपंचमी आणि यानंतर होते ते गौरी आवाहन. गौरी पूजन हे देखील भाद्रपद महिन्यातील महत्वाचे व्रत आहे. ज्येष्ठा गौरीचे प्रत्येकाकडे आपआपल्या परंपरेप्रमाणे पूजन होते. गौरी आवाहन ते गौरी विसर्जन यादरम्यान काय काय केले जाते. याची माहिती खास महाईन्यूजच्या वाचकांसाठी...**







अखंड सौभाग्यप्राप्तीसाठी स्त्रिया भाद्रपद महिन्याच्या शुद्ध पक्षात गौरींचे पूजन करतात. एका पौराणिक कथेनुसार, असुरांच्या त्रासाला कंटाळून सर्व स्त्रिया आपले सौभाग्य अक्षय करण्यासाठी गौरीला शरण गेल्या. तिची प्रार्थना केली. गौरीने भाद्रपद शुद्ध अष्टमीला असुरांचा संहार केला. तेव्हापासून अखंड सौभाग्य प्राप्त होण्यासाठी स्त्रिया ज्येष्ठा गौरी हे व्रत करतात. गौरी किंवा महालक्ष्मीचे पूजन ज्येष्ठ नक्षत्रावर केले जाते, म्हणून यांना ज्येष्ठागौरी असेही संबोधले जाते.



## गौरी आवाहन

पहिला दिवस गौरी आवाहनाचा असतो. आपापल्या पद्धत आणि परंपरेप्रमाणे घरातील प्रवेशद्वारापासून ते गौरी स्थापन करण्याच्या जागेपर्यंत रांगोळीने लक्ष्मीच्या पावलांचे ठसे काढावेत. हातात गौरी घेऊन आलेल्या बाईचे पाय दुधाने व पाण्याने धुवावे आणि त्यावर कुंकवाचे स्वस्तिक काढावे. आता येताना लक्ष्मीच्या पायांचे ठसे उमटवत उमटवत गौरींचे मुखवटे आणावेत. गौरी आगमन करत असताना ताट चमच्याने किंवा घंटेने वाजत गाजत गौरीचे स्वागत करावे. गौरीची स्थापना करण्यापूर्वी त्यांना घरातील समृद्धी, दूध-दुभत्याची जागा अशा गोष्टी दाखवाव्यात. आशीर्वाद मिळून ऐश्वर्य नांदो, अशी प्रार्थना करावी. अशा या प्रथेला गौरी आवाहन करणे, असे संबोधतात.

## गौरी पूजन

शुक्रवार २२ सप्टेंबर २०२३ दुसऱ्या दिवशी गौरी पूजनाचा असतो. या दिवशी काही सगेसोयरीक जेवणाला सांगितले जातात. गौरी पूजन आणि आरती करतात तसेच जेवायला पुरणपोळी, ज्वारीच्या पिठाची आंबील, अंबाडीची भाजी, सोळा भाज्यांची एकत्र भाजी, दिवेफळ वगैरे पदार्थांचा नैवेद्यात समावेश असतो. नैवेद्यात शेंगदाणा आणि डाळीची चटणी, पंचामृत, पडवळ घालून केलेली ताकाची कढी, कटाची आमटी, वेगवेगळ्या प्रकारची भजी, पापड, लोणचे इत्यादी करतात.

## गौरी विसर्जन

शनिवार २३ सप्टेंबर २०२३ः तिसरा दिवस म्हणजे गौरी विसर्जनाचा असतो. यादिवशी सकाळी पोवत्याच्या/सुताच्या गाठी पाडतात. त्या सुतात हळदीकुंकू, सुकामेवा, बेलफळ, फुले, झेंडूची पाने, काशीफळाचे फूल, रेशमी धागा असे एक एक जिन्नस घालून गाठी पाडतात. यांमध्ये हळदीकुंकू, रेशमी सूत, झेंडूची पाने, काशीफळाचे फूल हे महत्त्वाच्या वस्तू असतात. नंतर गौरींची/महालक्ष्मींची पूजा आणि आरती करतात. गोड शेवयाची खीर, उडीद डाळीचा भाजलेला पापड याचा नैवेद्य दाखवतात. या तिसऱ्या दिवशी गौरींच्या/महालक्ष्मींच्या चेहऱ्यावर एक प्रकारची उदासीनता दिसून येते. गौरींची पूजा, आरती करून पुढील वर्षी येण्याचे आमंत्रण देऊन त्यांचा निरोप घेतला जातो, आणि त्यांचे विसर्जन केले जाते. (धातूच्या किंवा कायम स्वरूपाच्या मूर्ती असतील तर त्यांचे विसर्जन करत नाहीत.) गौरींचे पाण्यात विसर्जन केल्यावर परत येताना थोडी वाळू घरी आणून ती सर्व घरभर व परसातल्या झाडांवर टाकतात. त्यायोगे घरात समृद्धी नांदते व झाडाझुडुपांचे कीटकांपासून संरक्षण होते अशी समजूत आहे. सकाळी ९ ते दुपारी २ वाजून ५६ मिनिटापर्यंत ज्येष्ठा गौरीचे विसर्जन करावे.

## गौरी आवाहन

गौरींचे आगमन हे नक्षत्रानुसार होते. अनुराधा नक्षत्रामध्ये गौरींचे आगमन होते आणि मूळ नक्षत्रात त्यांचे विसर्जन केले जाते. पहिल्या दिवशी तुळशीपासून पावला-पावलांनी डोक्यावरून गौरींना घरात आणले जाते. यावेळी ”गौरी आली, सोन्याच्या पावली...गौरी आली, चांदीच्या पावली...गौरी आली, गाई वासराच्या पावली...गौरी आली, पुत्र-पौत्रांच्या पावली...” असे म्हणत गौरींचे माहेरवाशीणीसारखे स्वागत केले जाते. त्यांना नवीन साड्या आणि दागदागिने घालून सजवले जाते.

## गौरी पूजन

दुसऱ्या दिवशी, जेष्ठा नक्षत्रावर गौरींचे पूजन केले जाते आणि गोडधोडाचे जेवण केले जाते. यामध्ये १६ भाज्या, ५ कोशिंबिरी, पुरणाचा स्वयंपाक असे पंचपक्वान्न केले जातात. या दिवशी सवाष्ण आणि ब्राह्मणांना जेवायला बोलावले जाते. तसेच गौरींना लाडू, चिवडा, करंज्या असे फराळाचे पदार्थ, मिठाई, फळे यांचाही नैवद्य दाखविला जातो. तसेच गौरीला विविध प्रकारची फुले आणि पत्री वाहिली जातात. सायंकाळी विवाहित स्त्रियांना हळदी-कुंकवासाठी बोलावले जाते. तसेच कुटुंबातील सदस्य, नातेवाईंकाना आणि मित्र-मैत्रिणींना गौरीच्या दर्शनासाठी घरी बोलावतात.

## ओवसा

अनेक ठिकाणी गौरी पूजनाच्या दिवशी ओवसा भरण्याची पद्धत असते. ओवसा म्हणजे गौरीला ओवाळणे किंवा ओवसणे , ज्याला ववसा असेही म्हटले जाते. या परंपरेद्वारे घरातील सुनेला मानसन्मान दिला जातो. त्यांना त्यांच्या आवडीच्या भेटवस्तू अथवा पैसेही दिले

## गौरी विसर्जन

तिसऱ्या दिवशी मूळ नक्षत्रावर गौरींचे विसर्जन केले जाते. काही जणांकडे गौरीसह गणरायाचे विसर्जन केले जाते, तर काही जणांकडे विसर्जन झाल्यानंतर १० दिवसांनीच गणपतीचे विसर्जन होते.

## ज्येष्ठ गौरी आवाहनाचे महत्त्व

या दिवशी माता गौरी म्हणजे माता पार्वती आणि गणेशाची पूजा केली जाते. गणेश चतुर्थीच्या दोन दिवसांनी माता पार्वती कैलास पर्वतावरून धरतीवर अवतरित झाली होती, असे मानले जाते. गणरायाप्रमाणेच गौरींचेदेखील उत्साहत स्वागत होते. यावेळी फुलांनी आणि कलाकुसरीच्या वस्तूंनी सजावट केली जाते. बाजारात सुंदर आणि सुबक असे गौरीचे मुखवटे मिळतात. यामध्ये शाडू, पितळे, कापडी, फायबरचे असे काही प्रकार पाहायला मळातात. काही जण केवळ मुखवट्यांची पूजा करतात, तर काही जणांकडे उभ्या गौरी असतात. कोकणात काही ठिकाणी खुर्चीवर बसलेली गौरी पाहायला मिळते. तसेच समुद्र किंवा नदीतील खडा आणून पूजण्याची रितही असते. काही ठिकाणी तांब्यावर चेहरा रेखाटून गौरी पूजन केले जाते. प्रत्येक कुटुंबात आपआपल्या पद्धतीनुसार गौरी बसविल्या जातात. मनोभावे गौरींची स्थापना करून त्यांचे पूजन केले जाते.

# पहिल्या सामन्यात भारताचा विजय!

## ऑस्ट्रेलियावर पाच विकेटने विजय; राहुलचे चौदावे अर्धशतक

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारताने पहिल्या वनडे सामन्यात ऑस्ट्रेलियाचा 5 विकेट्स राखून पराभव करत तीन सामन्यांच्या मालिकेत 1 - 0 अशी आघाडी घेतली आहे. भारताने ऑस्ट्रेलियाचे 277 धावांचे आव्हान 5 फलंदाजांच्या मोबदल्यात पार केले. भारताकडून सलामीवीर शुभमन गिलने 74 तर ऋतुराज गायकवाडने 71 धावांची खेळी केली.**

वनडेचा कोड क्रॅक करण्यात अखेर सूर्यकुमारला यश आलं. त्याने सावध सुरूवातीनंतर अर्धशतकी (50) खेळी केली. त्याने कर्णधार केएल राहुलने देखील अर्धशतकी (58) खेळी करत भारताच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

तत्पूर्वी, भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पहिल्या वनडे सामन्यात मोहम्मद शमीने ऑस्ट्रेलियाचा निम्मा संघ गारद केला. ऑस्ट्रेलियाला 50 षटकात 10 बाद 276 धावांपर्यंतच मजल मारता आली. कांगारूनकडून सलामीवीर डेव्हिड वॉर्नरने सर्वाधिक 51 धावा केल्या. तर जॉश इंग्लिसने 45 आणि स्टीव्ह स्मिथने 41 धावांचे योगदान दिले. भारताकडून जडेजा, अश्विन आणि बुमराह यांनी प्रत्येकी 1 विकेट घेतली. ऋतुराज गायकवाड एकदिवसीय कारकिर्दीतील पहिले अर्धशतक झळकावून बाद झाला. त्याला ॲडम झम्पाने एलबीडब्ल्यू केले. गायकवाडने 77 चेंडूत 92.21 च्या स्ट्राईक रेटने 71 धावा केल्या. भारतीय सलामीवीरांनी शतकी भागीदारी करत संघाला चांगली सुरुवात करून दिली. गिल-गायकवाड जोडीने 130 चेंडूत 142 धावांची सलामी दिली. ही भागीदारी ॲडम झाम्पाने मोडली. त्याने गायकवाडची विकेट घेतली. 277 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना टीम इंडियाने चांगली सुरुवात केली. शुभमन गिल आणि ऋतुराज गायकवाड यांनी अवघ्या 10 षटकांत 66 धावा जोडल्या. प्रथम फलंदाजी करताना



ऑस्ट्रेलियन संघाने 50 षटकांत 10 गडी गमावून 276 धावा केल्या. सलामीवीर डेव्हिड वॉर्नरने 52 धावांचे अर्धशतक झळकावले, तर स्टीव्ह स्मिथने 41 धावा केल्या.

भारतीय संघाकडून मोहम्मद शमीने 5 बळी घेतले. जसप्रीत बुमराह, रविचंद्रन अश्विन आणि रवींद्र जडेजा यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली. ऑस्ट्रेलियन डावाची केवळ 35.4 षटके खेळली गेली तेव्हा पाऊस आला आणि खेळ थांबवावा लागला, मात्र काही वेळातच पाऊस थांबला आणि सामना पुन्हा सुरू झाला. सलामीवीर डेव्हिड वॉर्नरने वनडे कारकिर्दीतील 29वे अर्धशतक झळकावले. त्याने 49 चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. वॉर्नर 98.11 च्या स्ट्राइक रेटने 53 चेंडूत 52 धावा करून बाद झाला. त्याच्या खेळीत 6 चौकार आणि 2 षटकारांचा समावेश होता. 4 धावांवर मिशेल मार्शची विकेट गमावल्यानंतर डेव्हिड वॉर्नर आणि स्टीव्ह स्मिथने ऑस्ट्रेलियाचा डाव सांभाळला. दोघांनी अर्धशतकी भागीदारी केली आहे. नाणेफेक हारल्यानंतर फलंदाजीला आलेल्या ऑस्ट्रेलियन संघाची सुरुवात सरासरीने झाली. संघाने पहिल्या 10 षटकांत 1 गडी बाद 42 धावा केल्या. मोहम्मद शमीने पहिल्याच षटकात भारतीय संघाला यश मिळवून दिले. त्याने सलामीवीर मिशेल मार्शला 4 धावांवर बाद केले. या मालिकेत टीम इंडियाला वर्ल्ड कपच्या तयारीची कसोटी पाहण्याची शेवटची संधी असेल. भारतीय संघ तब्बल 4 वर्षांनंतर या मैदानावर ऑस्ट्रेलियाशी खेळणार आहे. येथे मागील सामन्यात ऑस्ट्रेलियाने टीम इंडियाचा 4 विकेटने पराभव केला होता. भारतीय निवड समितीने विश्वचषकापूर्वी संघातील ५ वरिष्ठ खेळाडूंना विश्रांती दिली आहे. रोहित शर्मा, विराट कोहली, हार्दिक पंड्या, अक्षर पटेल आणि कुलदीप यादव यांना मालिकेतील पहिल्या 2 सामन्यातून विश्रांती देण्यात आली आहे. ऑस्ट्रेलियन संघ एकदिवसीय फॉर्मेटमध्ये हेड टू हेड आकडेवारीत मजबूत आहे. या दोघांमध्ये एकूण 14 मालिका खेळल्या गेल्या आहेत, त्यापैकी ऑस्ट्रेलियाने 8 तर भारताने 6 जिंकल्या आहेत. या दोघांमध्ये 11 मालिका भारतात खेळल्या गेल्या, ऑस्ट्रेलियाने 6 आणि भारताने 5 जिंकल्या.

### गिल सर्वाधिक धावा करणारा खेळाडू

केएल राहुल पहिल्यांदाच ऑस्ट्रेलियाविरुद्ध भारताचे नेतृत्व करणार आहे. त्याच्या नेतृत्वाखाली भारताने आतापर्यंत 7 एकदिवसीय सामने खेळले आहेत, ज्यात संघाने 4 जिंकले आणि 3 गमावले. सामन्यापूर्वी प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी सूर्यकुमार यादव आणि रविचंद्रन अश्विन यांचा बचाव केला, दोन्ही खेळाडू आजचा सामना खेळणार आहेत. ऑस्ट्रेलिया संघ भारताविरुद्ध 14 विश्वचषक खेळाडू आणि 6 अतिरिक्त खेळाडूंसह मालिका खेळत आहे. दुखापतग्रस्त मिचेल स्टार्क आणि ग्लेन मॅक्सवेल पहिल्या वनडेत खेळू शकणार नाहीत.

# आशियाई क्रीडा स्पर्धांना आजपासून प्रारंभ!

## ‘इस बार सौ पार’ अशा घोषवाक्यासह भारताचे पथक चीनमध्ये दाखल

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**करोनामुळे एक वर्ष लांबणीवर पडलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धांना आज, शनिवारपासून अधिकृतरीत्या सुरुवात होणार आहे. अर्थात, काही क्रीडा प्रकारांना यापूर्वीच सुरुवात झाल्यामुळे उद्घाटन सोहळा हेच आजच्या दिवसाचे खास आकर्षण असेल. भारताचे यंदाच्या स्पर्धेत आशियाई स्तरावरील आपली ताकद दाखवून देण्याचे लक्ष्य असेल.**

‘इस बार सौ पार’ अशा घोषवाक्यासह भारताचे पथक चीनमध्ये दाखल झाले आहे. यंदा भारताने आजवरचे आपले सर्वात मोठे ६५५ खेळाडूंचे पथक आशियाई स्पर्धेसाठी पाठवले आहे.

इंडोनेशियात २०१८ मध्ये झालेल्या गेल्या आशियाई स्पर्धेत भारताने ७० (१६ सुवर्ण, २३ रौप्य, ३१ कांस्य) पदकांची कमाई केली होती. या वेळी हा आकडा शंभरी गाठणार असा विश्वास जाणकार व्यक्त करत आहेत. स्पर्धेत ४० क्रीडा प्रकारांचा समावेश असला तरी भारत ३९ क्रीडा प्रकारांत सहभाग घेणार आहे.

कोरियात १९८६ मध्ये झालेल्या स्पर्धेत भारत पदकतालिकेत पाचव्या स्थानावर राहिला होता. मात्र, त्यानंतर भारत पहिल्या पाचात येऊ शकलेला नाही. हे चित्र या वेळी बदलण्याचे उद्दिष्ट भारताने ठेवले आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेत नेहमीच ॲथलेटिक्स आणि कुस्तीने भारताची पदके वाढवली आहेत. या वेळीही ॲथलेटिक्समध्ये निश्चित आशा आहेत, पण कुस्तीमधील पदकांबाबत कमालीची धाकधूक आहे. जागतिक स्पर्धेतील अपयशाच्या



पार्श्वभूमीवर मल्ल सहभागी होणार असल्यामुळे त्यांच्यावर वेगळेच दडपण असेल.

नीरज चोप्रा (भालाफेक), मीराबाई चानू (वेटलिफ्टिंग), पी. व्ही. सिंधू (बॅडिमटन), बजरंग पुनिया (कुस्ती), लवलिना बोरगोहेन (बॉक्सिंग) या ऑलिम्पिक पदक विजेत्यांकडून अपेक्षा. अविनाश साबळे (३ हजार मीटर स्टीपलचेस), एच. एस. प्रणॉय (बॅडिमटन), मीराबाई चानू (वेटलिफ्टिंग), ज्योती सुरेखा वेन्नम, आदिती स्वामी (तिरंदाजी), निखत झरीन (बॉक्सिंग), पुरुष व महिला क्रिकेट संघ, पुरुष व महिला कबड्डी संघ, पुरुष व महिला हॉकी संघ हे यंदा सुवर्णपदकाच्या शर्यतीत. टेनिसमध्ये अनुभवी रोहन बोपण्णामुळे पदकाची आशा. नेमबाजांकडेही लक्ष. आशियाई क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन आज चीनचे अध्यक्ष शी जिनिपग यांच्या हस्ते करण्यात येणार असून, उद्घाटन सोहळाही अन्य स्पर्धांच्या तुलनेत भव्य असेल असे मानले जात आहे. चीनने स्पर्धेसाठी आतापर्यंत १.४ अब्ज डॉलर इतका खर्च केला आहे.

या वेळच्या आशियाई स्पर्धेतील सहभागी खेळाडूंच्या आकडय़ाने ऑलिम्पिकलाही मागे टाकले आहे. आशियाई स्पर्धेत १२ हजारहून अधिक स्पर्धक सहभागी होणार आहेत.

टोक्यो येथे झालेल्या गेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत ११ हजार खेळाडूंचा सहभाग होता. आगामी पॅरिस ऑलिम्पिकसाठी हा आकडा त्याहून कमी म्हणजे १०,५०० इतकाच राहणार आहे.

### प्रतिकूल परिस्थितीत आयोजन

एक वर्षांनंतर चीनने आशियाई स्पर्धेच्या आयोजनाचे शिवधनुष्य उचलले असले, तरी संघटन पातळीवर स्पर्धेसाठी फारसी अनुकूल परिस्थिती नाही. आशियाई ऑलिम्पिक समितीची निवडणूक कुवैतच्या शेख तलाल फहाद अहमद अल सबा यांनी जिंकली होती. त्यांच्या मोठय़ा भावाने शेख अहमदने ३० वर्षे या समितीचे अध्यक्षपद भूषविले होते. मात्र, निवडणुकीत त्यांनी वैयक्तिक पातळीवर चौकटी बाहेर जाऊन प्रयत्न केल्यामुळे आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने आशियाई ऑलिम्पिक समितीस निलंबित केले. अशा वेळी भारताच्या रणधीर सिंग यांच्याकडे तात्पुरती जबाबदारी देऊन ही स्पर्धा पार पाडली जात आहे. रणधीर सिंग यांनी यापूर्वी या समितीचे सरचिटणीसपद सांभाळले आहे.